सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान
अंतर्गत

# मराठी विज्ञान परिषद, विभाग पानगाव

(ता.रेणापूर जि. लातूर)

# घटना नियम

(२०१९ पासून)

पत्रव्यवहाराचा पत्ता – १४, प्लॅटिनम अपार्टमेंट्स, देसाई नगर,
नांदेड-सोलापूर रिंग रोड, लातूर – ४१३ ५१२
**दूरध्वनी क्र**. ९१–८३२९०३२१६४, ९४२२६११००२
ई-मेल: skspratishthan@gmail.com

सन २०१८ साली सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान या विश्वस्त संस्थेने, सादर केलेल्या संकल्प व प्रस्तावास मराठी विज्ञान परिषद, मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयाकडून दि. ४ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्राप्त झालेल्या ईमेलद्वारे (परिशिष्ट १) मिळालेल्या तत्वत: मंजुरीनंतर सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान या विश्वस्त संस्थेअंतर्गत पानगाव येथील मराठी विज्ञान परिषदेच्या विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागाचे दि. ७ फेब्रुवारी, २०१९ रोजी लातूर येथे आयोजित पदाधिकाऱ्यांच्या (प्रस्तावित) बैठकीत संमत करण्यात आलेले नियम खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.

**घटना नियम**

१. संस्थेचे नाव **'सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान अंतर्गत मराठी विज्ञान परिषद**, **पानगाव'** असे आहे. तिचा उल्लेख परिषद असा पुढे केला आहे. ***नाव***

२. परिषदेचे मुख्य कार्यालय पानगाव येथे राहील. मात्र, पत्रव्यवहाराच्या सोयीसाठी दरवेळी नियमानुसार निवडून आलेल्या सचिवांच्या निवासस्थानाचा पत्ता गृहित धरला जाईल. ***कार्यालय***

***उद्देश***

३. **' मराठी विज्ञान परिषद**, **विभाग पानगाव'**चे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. विज्ञानाचा प्रामुख्याने मराठी भाषेतून प्रसार करणे.
२. विज्ञान व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा समृद्ध करणे.
३. जीवनात विज्ञानाचे महत्त्व वाढवणे.
४. वैज्ञानिक संशोधन व विज्ञानाची प्रगती करणे.
५. मुख्यत्वे करून शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यात विज्ञानाची आवड निर्माण करणे.
६. दैनंदिन ग्रामीण जीवनातील विज्ञानवादी तत्वांचा परिपोष करण्याचा प्रयत्न करणे.
७. शेती, आरोग्य अशा क्षेत्रांत विज्ञानवादी दृष्टिकोनाचे प्राधान्य जनमानसावर ठसवण्यासाठी आयोजन करणे.
८. प्रयोगशाळांची कमतरता असलेल्या भागात विद्यार्थ्यांसाठी क्रमिक प्रयोगांचे, तसेच विज्ञानप्रसारास्तव विविध उपक्रम आयोजित करणे.

***साधने व कार्यपद्धती***

**४.** परिषदेचे उद्देश साधण्यासाठी पुढील साधनांचा उपयोग केला जाईल.

१. व्याख्याने व चर्चा आयोजित करणे.
२. नियतकालिके व पुस्तके प्रसिध्द करणे.
३. ग्रंथालये, वस्तुसंग्रह, प्रदर्शने, सहली, भेटी, शिबिरे, स्पर्धा इ. चे आयोजन.
४. चित्रपट, नाटक, आकाशवाणी, दूरदर्शन, ध्वनीमुद्रिका इ. माध्यमांचा वापर.
५. प्रयोगशाळा चालवणे, संशोधन करणे, सल्ला देणे.
६. ग्रामीण भागात ठिकठिकाणी मराठीतून विज्ञानप्रसारास्तव उपक्रम करणे.
७. मराठीतील व अन्य भाषांतील विज्ञानकार्याची माहिती संकलित करणे.
८. ग्रामीण भागात अनुदाने, शिष्यवृत्त्या, पारितोषिके इ. द्वारे प्रोत्साहन देणे.
९. विज्ञानप्रसारास्तव मनोरंजक विज्ञान खेळांचे, कार्यशाळांचे आयोजन, आकाशदर्शन, उपकरणे बनविणे इ. उपक्रमांचे आयोजन करणे.
१०. विज्ञानप्रसारास्तव शासन व अन्य संस्थांशी अनुषंगिक उपक्रमांत सहभाग घेणे व सहकार्य करणे.
११. विज्ञानप्रेमी लोकांचे प्रतिनिधीत्व करणे.
१२. परिषदेच्या कार्यासाठी निधी जमविणे व आवश्यक खर्च करणे.
१३. परिषदेच्या कार्यासाठी स्थावर व जंगम मालमत्ता विकसित करणे, पुनर्विकसित करणे, विकत घेणे, विकणे, भाड्याने घेणे आणि देणे व तारण ठेवणे.
१४. परिषदेच्या कार्यासाठी आवश्यक कर्जे व ठेवी घेणे आणि देणे.
१५. परिषदेच्या उद्देशांस पोषक असे इतर योग्य उपाय योजणे.

**वर्ष गणना**

**५.**

परिषदेचे वर्ष दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

**सभासदत्व**

**६.**

१. परिषदेचे घटना नियम मान्य असलेल्या व अठरा वर्षे वय पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तीस परिषदेचे सभासद होता येईल.

२. व्यक्ती सभासदांचे वर्ग –

*आजीव सभासद - रु. २५००/- देवून सभासद होणारे
**साधारण सभासद वार्षिक रु. २५०/- वर्गणी देणारे
विद्यार्थी सभासद - वार्षिक रु. २५/- वर्गणी देणारे विद्यार्थी
देणगीदार सदस्य - किमान रु. १००/- देणारे
सन्मान्य सभासद घटना नियम ६(९) नुसार नेमलेले.

*** आजीव सभासदत्व एकाच आर्थिक वर्षात शुल्क किमान पाच सलग हप्त्यांत देता येईल. पूर्ण रक्कम दिल्यानंतरच सभासदत्व स्थापित होईल. ** अनेक वर्षांचे साधारण सदस्यत्व शुल्कही एकरकमी देता येईल.**

३. याशिवाय, रु. ५००० /- व अधिक एकरकमी वर्गणी देणाऱ्या उपकर्ते, आश्रयदाते व हितचिंतक या वर्गातील सभासदत्वही स्वीकारण्यात येईल.

४. उपकर्ते, आश्रयदाते व हितचिंतक या वर्गातील सभासद परिषदेचे आजीव सभासद असतील.

५. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने कार्यकारी मंडळाकडे, मंडळाने ठरविलेल्या नमुन्यानुसार अर्ज पाठवावा व सोबत आपली वर्गणी पाठवावी.

६. परिषदेकडे आलेल्या सर्व अर्जांचा विचार कार्यकारी मंडळ करील व मंडळाने अर्ज संमत केल्यापासून अर्जदाराला सभासदत्व प्राप्त होईल. सभासदत्त्वाचा अर्ज नामंजूर केल्यास त्याची कारणे दिली जाणार नाहीत. मात्र अर्जाबरोबरची वर्गणी परत केली जाईल.

७. साधारण सभासदांनी वार्षिक वर्गणी दर वर्षी ३० एप्रिल किंवा त्या पूर्वी दिली पाहिजे. मात्र नव्या सभासदाची पहिल्या वर्षाची वर्गणी त्याच्या अर्जाबरोबर घेतली जाईल.

८. कोणत्याही सभासदाचे निधन / सभासद संस्थेचे विसर्जन झाल्यास किंवा त्याने राजीनामा दिल्यास किंवा त्याच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव संमत झाल्यास त्याचे सभासदत्व संपुष्टात येईल. त्याशिवाय, कोणत्याही सभासदाची वर्गणी नियमांनुसार वेळेवर न आल्यास त्यासाठी सभासदत्व मुदत वाढविण्याचा किंवा त्याचे सभासदत्त्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. सभासदत्व संपले तरी त्याच्याकडून परिषदेला जी येणी असतील ती रद्द होणार नाहीत व दिलेली वर्गणी त्याला परत मिळणार नाही.

९. विज्ञानाची उच्च सेवा करणाऱ्या व्यक्तींना परिषदेचे सन्मान्य सभासद म्हणून नेमण्याचा मुख्य कार्यकारी मंडळाला अधिकार राहील. हे सभासद आजीव सभासद मानले जातील व त्यांना वर्गणी द्यावी लागणार नाही. अशा सन्मान्य सभासदांची शिफारस परिषदेच्या सर्वसाधारण सभेत बहुमताने झाली पाहिजे. हयात असलेल्या सन्मान्य सभासदांची संख्या एकावेळी ५ हून अधिक असणार नाही व दरवर्षी एक सन्मान्य सभासद नेमता येतील.

१०. सर्व वर्गाच्या व्यक्ती सभासदांना समान मताधिकार राहतील.

११. सभासद ही संज्ञा व्यक्ती सभासद व सन्मान्य सभासद यासाठी वापरली आहे. विद्यार्थी सभासदांसाठी निराळे घटना नियम आहेत.

**विद्यार्थी सभासद**

**७.**

१. अठरा वर्षाहून कमी वय असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास परिषदेचे विद्यार्थी सभासद होता येईल.

२. विद्यार्थी सभासदांना साधारण सभेत मतदान करण्याचा, कार्यकारी मंडळावर व अन्य अधिकृत स्थानावर निवडून येण्याचा अधिकार असणार नाही.

३. विद्यार्थी सभासदत्त्वाची वर्गणी वार्षिक रुपये २५/- (रुपये पंचेवीस फक्त) राहील.

४. विद्यार्थी सभासदांना संदर्भालय, कार्यक्रम इत्यादींचा नियमाप्रमाणे लाभ घेता येईल.

८.

**सभासदाचे अधिकार**

सभासदांना पुढील अधिकार राहतील.

१. परिषदेच्या साधारण सभांमध्ये भाग घेणे व मत देणे.

२. विज्ञान अधिवेशनात अधिवेशनाच्या नियमानुसार भाग घेणे.

३. परिषदेच्या निवडणुकीस निवडणुकीच्या नियमांनुसार उभे राहणे, मतदारांच्या याद्या बघणे व मत देणे.

४. निवडणुकीत कार्यकारी मंडळ ठरवील त्या पोटनियमांनुसार मराठी विज्ञान परिषद पत्रिका, संदर्भालय, कार्यक्रम इत्यादींचा लाभ घेणे.

**कार्यकारी मंडळे**

९.

परिषदेची दोन कार्यकारी मंडळे असतील. एक मुख्य व दुसरे स्थानिक.

**मुख्य कार्यकारी मंडळ -** सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ हेच परिषदेचे मुख्य कार्यकारी मंडळ असेल. प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हाच परिषदेच्या मुख्य कार्यकारी मंडळाचा कार्यकाल राहील.

१. परिषदेचा कारभार मुख्य कार्यकारी मंडळाकडे राहील.

२. **स्थानिक कार्यकारी मंडळ –**

अ) परिषदेचे समन्वयक – मुख्य कार्यकारी मंडळाने नामनिर्देशित केलेले - १

आ) परिषदेने तीन वर्षासाठी निवडलेले सभासद – ५

(यांपैकी एक कोषाध्यक्ष असेल. आवश्यकता भासल्यास एक सहसमन्वयक.)

इ) परिषदेने एक वर्षासाठी निवडलेले सभासद - २

ई) मुख्य कार्यकारी मंडळाने स्वीकृत केलेले सभासद - १

३.

अ) स्थानिक कार्यकारी मंडळावरील सभासदाची जागा मध्येच रिकामी झाल्यास मुख्य कार्यकारी मंडळाने सभासद स्वीकृत करुन ती जागा भरावी. अशा रीतीने निवडलेल्या सभासदांची मुदत मूळ सभासदाच्या मुदती इतकी राहील.

आ) सात दिवसांच्या पूर्वसूचनेने प्रतिष्ठानचे कार्यवाह / सचिव, समन्वयक किंवा त्यांच्या अनुमतीने अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेला सदस्य स्थानिक कार्यकारी मंडळाची सभा बोलावू शकतील.

इ) स्थानिक कार्यकारी मंडळाची सभा / बैठक दर महिन्यात एक किंवा समन्वयक गरजेप्रमाणे ठरवतील, त्यानुसार होईल. सभेची गणसंख्या ५ (पाच) राहील. गणपूर्ती न झाल्यास सभा घेण्याचा अथवा रद्द अथवा प्रलंबित करण्याचा अधिकार सभेच्या अध्यक्षांचा / समन्वयकांचा असेल.

ई) प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेच्या किमान दहा दिवस अगोदर परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा होईल. प्रतिष्ठानचे सचिव व सचिव नसतील, तर समन्वयक, त्या सभेचे अध्यक्ष असतील. परिषदेच्या स्थानिक कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेस निमंत्रित सदस्य असू शकतील.

**स्थानिक कार्यकारी मंडळाचे अधिकार**

१०.

स्थानिक कार्यकारी मंडळाची संरचना ८(२) नुसार आणि अधिकार पुढीलप्रमाणे असतील -

१) प्रतिष्ठानचे सचिव अथवा समन्वयक यांनी बोलावलेल्या सभांत सहभागी होणे.

२) स्थानिक व परिसरातील आवश्यकतेनुसार उपक्रम व कार्यक्रमांची आखणी करणे.

३) वेळोवेळी ठरलेल्या जबाबदाऱ्यांची पूर्तता करणे.

४) ठरलेल्या कार्यक्रम / उपक्रम यांचे आर्थिक नियोजन करणे.

५) ठरलेल्या कार्यक्रम / उपक्रम यांचे प्रस्ताव तैय्यार करणे व ते समन्वयकांमार्फत प्रतिष्ठानला सादर करणे.

६) प्रतिष्ठानच्या, तसेच मराठी विज्ञान परिषदेच्या मध्यवर्ती कार्यालयाने आखून दिलेल्या उपक्रमांचे नियोजन, आयोजन करणे.

७) सर्व उपक्रम, कार्यक्रम यांचे हिशेब करणे व ते समन्वयकांमार्फत प्रतिष्ठानला सादर करणे.

८) प्रतिष्ठान व परिषद यांच्या उद्देशांचे, नियम व अटींचे पालन करणे.

९) परिषदेच्या घटनानियमांना बाधक ठरणार नाहीत अशीकार्यपद्धती ठरवणे, असलेल्या कार्यपद्धतीत बदल करणे.

१०) परिषदेची वार्षिक व विशेष सर्व साधारण सभा बोलावणे.

११) वार्षिक साधारण सभेला मागील वर्षाचा वृत्तांत व हिशेब तपासनिसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे.

१२) परिषदेसाठी वर्गण्या, देणग्या, अनुदाने, पारितोषिक निधी, बिनव्याजी ठेवी वगैरे मिळवणे.

१३) प्रतिष्ठानच्या अनुमतीने कार्यालय, सभागृह अगर अन्य मिळकतीची वास्तू बांधणे, विकत घेणे, भाड्याने घेणे अथवा अन्य प्रकारे त्यांची सोय करणे.

१४) परिषदेची मालमत्ता व कागदपत्र यांची व्यवस्था ठेवणे.

१५) बँकामध्ये परिषदेची खाती उघडणे व तत्संबंधी वेळोवेळी योग्य ठराव करुन दोन सदस्यांना सदर खात्यासंबंधीचे अधिकार देणे. या दोन सदस्यांपैकी एक समन्वयक असला पाहिजे.

**सर्वसाधारण सभा**

**११.**

१. परिषदेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून एक महिन्यांच्या आत परिषदेची वार्षिक सर्व साधारण सभा कार्यकारी मंडळाकडून बोलावली जाईल. प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेच्या किमान दहा दिवस अगोदर परिषदेची सर्वसाधारणसभा होणे गरजेचे असेल.

२. मुख्य कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटल्यास किंवा परिषदेच्या किमान १/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास, तशी मागणी मुख्य कार्यकारी मंडळाकडे आल्यापासून एक महिन्याच्या आत, मुख्य कार्यकारी मंडळ विशेष साधारण सभा बोलावील. विशेष साधारण सभेत फक्त कार्यक्रम पत्रिकेवरील विषयसूचीचाच विचार होईल. **या सभेस किमान १/२ सदस्यांची संख्या आवश्यक राहील.**

३.साधारण सभेची सूचना व कार्यक्रमपत्रिका सर्व सभासदांना किमान पंधरा दिवसांच्या पूर्वसूचनेने पाठवण्यात येतील. वार्षिक साधारण सभेच्या सूचनेबरोबर वार्षिक वृत्तांत, हिशेब पत्रके व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक परिषदेस योग्य व सुलभ वाटेल त्या पद्धतीने (शक्यतो इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे व विहित केलेल्या समूहावर) पाठवण्यात येईल आणि निवडणुकीची सूचना देण्यात येईल.

४.सर्व साधारण सभा सामान्यतः पानगाव येथे भरेल. परंतु विशिष्ट परिस्थितीत अशी सभा अन्यत्र घेण्याचा कार्यकारी मंडळाला अधिकार राहील.

५. साधारण सभेची गणसंख्या २० राहील. गणसंख्येच्या अभावी वार्षिक सर्व साधारण सभा१५ मिनिटे स्थगित होऊन पुन्हा त्याच ठिकाणी भरेल व या पुन्हा भरणाऱ्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. विशेष सर्व साधारण सभा मात्र गणसंख्येच्या अभावी रद्द होईल.

६. प्रतिष्ठानचे सचिव साधारण सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील हे शक्य न झाल्यास परिषदेचे समन्वयक अध्यक्षस्थान स्वीकारतील. हेही शक्य न झाल्यास सभा उपस्थित सभासदांतून आपला अध्यक्ष निवडील.

७. अविश्वासाचा ठराव, परिषदेच्या नियमांची दुरुस्ती, विश्वस्तास पदांवरुन काढणे, परिषदेचे विसर्जन या विषयांखेरीज अन्य प्रश्नांवर सरळ मताधिक्याने सर्व साधारण सभा निर्णय घेईल. मते समान पडल्यास सभेचे अध्यक्ष निर्णायक मत देतील. मत देणारा मतदार साधारण सभेच्या अगोदरच्या ३१ मार्च रोजी परिषदेचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील ३० एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही वर्गणी येणे बाकी असता कामा नये.

८. वार्षिक वृत्तांतासंबंधी व हिशेबासंबंधी सभेत प्रश्न विचारायचे झाल्यास सभेअगोदर किमान सात दिवस सभासदांनी परिषदेच्या कार्यालयाकडे ते लेखी पाठविले पाहिजेत.

**साधारण सभेचे अधिकार**

**१२.**

साधारण सभेला पुढील अधिकार असतील.

१. वार्षिक साधारण सभेत मागील वार्षिक व विशेष साधारण सभांचे इतिवृत्त, वार्षिक वृत्तांत, हिशेब व पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक संमत करणे व हिशेब तपासनीस नेमणे.

२. कार्यकारी मंडळांनी व सभासदांनी मांडलेल्या सूचनांवर निर्णय घेणे.
३. नियमांनुसार समन्वयकांची व कार्यकारी मंडळाच्या सभासदांची निवड.
४. नवीन सदस्यांच्या सदस्यत्वाला मान्यता देणे.

**पदाधिकारी**

१३.

१. परिषदेचे समन्वयक, सहसमन्वयक व कोषाध्यक्ष हे पदाधिकारी मानले जातील.
२. परिषदेतर्फे किंवा परिषदेविरुध्द होणाऱ्या कायदेशीर कारवाया प्रतिष्ठानच्या अध्यक्षांच्या नावे होतील.
३. समन्वयक व सहसमन्वयक यांनी प्रतिष्ठानच्या अध्यक्षांच्या व सचिवांच्या सल्ल्याने व मुख्य कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार सर्व कार्य करावे.
४. रोख रु. २०००/- (रुपये दोन हजार) पर्यंत अनामत रक्कम प्रत्येक समन्वयक, सहसमन्वयक व कोषाध्यक्षांना आवश्यकते नुसार स्वतःजवळ दोन महिने कालावधीसाठी ठेवता येईल. समन्वयक व सहसमन्वयक यांनी साधारण सभांची व कार्यकारी मंडळाच्या सभांचे इतिवृत्त लिहून घेण्याची सोय करावी. परिषदेची मुद्रा व दप्तर यांचा सांभाळ करावा व पत्रव्यवहार करावा.
५. कोषाध्यक्षांनी हिशेब ठेवावेत व परिषदेतर्फे होणारे खर्च योग्य नियमांनुसार व ठरावानुसार होत आहेत याची खात्री करुन घ्यावी. कोषाध्यक्षांची अगर कार्यकारी मंडळाने अधिकार दिलेल्या अन्य व्यक्तींची स्वाक्षरी असलेलीच पावती कायदेशीर समजली जाईल.
६. अनपेक्षित व आवश्यक कार्य उदभवल्यास त्यासाठी रु. १५,०००/- (रुपये पंधरा हजार) पर्यंत खर्च मंजूर करण्याचा अधिकार समन्वयक व सहसमन्वयक यांना राहील. अशा विशेष खर्चाची माहिती मुख्य कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

**निवडणुका**

१४.

१. दर तीन वर्षांनी स्थानिक कार्यकारी मंडळाची निवडणूक वार्षिक साधारण सभेत पुढील तीन वर्षांसाठी होईल. समन्वयक व सहसमन्वयक यांची जागा काही कारणांनी मध्येच रिकामी झाल्यास पुढील वार्षिक सभेत समन्वयक त्यांची तीन वर्षासाठी निवडणूक होईल. दरवर्षी स्थानिक कार्यकारी मंडळावरुन निवृत्त / रिक्त होणाऱ्या सदस्यांच्या जागांसाठी वार्षिक साधारण सभेत निवड / निवडणूक होईल.
२. निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार व मत देणारा मतदार, तसेच निवड करण्यात आलेला सदस्य हा वार्षिक सभेअगोदरील ३१ मार्च रोजी परिषदेचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील ३० एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही वर्गणी येणे बाकी असता कामा नये. तसेच परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास निवडणूकीस उभे राहता येणार नाही.
३. सूचक व अनुमोदनासह उमेदवाराचा लेखी अर्ज वार्षिक सभेपूर्वी सात दिवस कार्यालयाकडे पोहोचला पाहिजे. या अर्जाची छाननी प्रतिष्ठानचे कार्यवाह करतील व योग्य ठरलेले अर्ज कार्यालयात जाहीर करतील. उमेदवारास निवडणूक व्हायच्या एक दिवस आधी दुपारी १२.०० वाजेपर्यंत निवडणुकीतून नाव मागे घेता येईल. एकही अर्ज न आल्यास, मुख्य कार्यकारी मंडळ, समन्वयक व सहसमन्वयक यांच्याशी विचारविनिमयातून सदस्याची निवड बैठकीदरम्यान करतील. ती अंतिम व बंधनकारक असेल.
४. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असले तर त्यांची बिनविरोध निवड होईल. निवडून द्यावयाच्या जागांहून जास्त उमेदवार असल्यास निवडणुका होतील. मतदानाचा अधिकार असलेले उपस्थित सभासद गुप्त मतदान पध्दतीने मते देतील. जितक्या जागा असतील तितक्या किंवा कमी उमेदवारांना प्रत्येकी एक याप्रमाणे मत देण्याचा मतदाराला अधिकार राहील. समप्रमाणात मते पडल्यास चिठ्ठया टाकून निर्णय घेण्यात येईल.
५. स्थायी समितीने नियुक्त केलेले निवडणूक अधिकारी व दोन सहाय्यक निवडणुकीची व्यवस्था बघतील. निवडणूक अधिकारी सभेस निर्णय सादर करतील व तो अंतिम मानला जाईल. निवडून आलेले उमेदवार साधारण सभेनंतर कार्यकारी मंडळाचे सभासद मानले जातील.
६. निवडणूक अधिकारी स्वाक्षरी व परिषदेची मुद्रा उठवून मतपत्रिका मतदारास देतील.

७. निवडणुकीसंबंधी कुठलीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करून निवडणूक अधिकारी आपला निर्णय देतील, तो निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

८. निवडणूक संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी होईल.

९. मतमोजणी संपवून आपले लेखी निर्णय निवडणूक अधिकारी स्वाक्षरी करून सभेस निर्णय सादर करतील व तो अंतिम मानला जाईल. निवडून आलेले उमेदवार साधारण सभेनंतर कार्यकारी मंडळाचे सभासद मानले जातील.

**अविश्वासाचा ठराव**

१५.

एखाद्या सभासदांचे वर्तन परिषदेच्या हिताला बाधक आहे असे वाटल्यास साधारण सभेला त्या सभासदाविरुध्द उपस्थितांची किमान २/३ मते मिळवून अविश्वासाचा ठराव संमत करता येईल. असा ठराव संमत झाल्यापासून त्या सभासदाचे सभासदत्व रद्द होईल. अविश्वासाच्या ठरावाची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे व ठराव संमत करणारी सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली सभा असता कामा नये.

**घटना नियम दुरुस्ती**

१६.

१. परिषदेचे घटना नियम दुरुस्त करण्याचा साधारण सभेला अधिकार राहील. परिषदेचे नाव किंवा उद्देश यांव्यतिरिक्त अन्य घटना नियम दुरुस्त करावयाचे असल्यास दुरुस्तीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे व ठराव करणारी सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली नसली पाहिजे. उपस्थित सभासदांपैकी किमान २/३ सभासदांनी सूचनेच्या किंवा सभेत मांडलेल्या उपसूचनांच्या बाजूने मतदिल्यास अशी सूचना व उपसूचना मंजूर होऊन त्यानुसार घटना नियम दुरुस्त होतील. असंमत झालेली सूचना निदान सहा महिने पुन्हा विचारार्थ घेतली जाणार नाही. नवीन घटना नियम करणे, जुने घटना नियम गाळणे किंवा बदलणे यांचा घटना नियमदुरुस्तीत अंतर्भाव होतो.

२. याबाबतीत प्रतिष्ठानच्या नियमांच्या अधीन राहून अंतिम निर्णय केला जाईल.

**विसर्जन**

१७.

अपरिहार्य परिस्थितीत संस्था नोंदणी अधिनियमानुसार व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांच्या धर्तीवर, एकूण सभासद संख्येच्या २/३ सभासदांनी तसा ठराव रीतसर सादर करून स्थानिक सर्वसाधारण सभेत मंजूर करून घेतल्यानंतर तो प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेत सादर केला जाईल. त्या ठरावावर प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेने पुन्हा २/३ अशा मताधिक्याने मंजूर केल्यास परिषदेचे एक वर्षासाठी विसर्जन करण्यात येईल. या एका वर्षात परिषदेची पुनर्रचना करून तसा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयाकडे (मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्याकडे) पाठवण्यात येईल. मध्यवर्ती कार्यालयाच्या मान्यतेनंतरच पुनर्रचना कायम करून नवीन प्रक्रिया पूर्ण करून मराठी विज्ञान परिषद, पानगाव पुनर्स्थापित करण्यात येईल. सहा महिने मध्यवर्ती कार्यालयाकडून याबाबतीत सकारात्मक निर्णय न आल्यास परिषद कायमची विसर्जित घोषित करण्यात येईल.

तद्नंतरच्या लगेच होणाऱ्या प्रतिष्ठानच्या कार्यकारी सभेत परिषदेच्या विसर्जनाची सूचना संमत झाल्यास परिषदेचे विसर्जन होईल. त्यावेळी असलेली परिषदेची स्थावर आणि जंगम मालमत्ता सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानकडे किंवा समान उद्देशाने काम करणा-या नोंदणीकृत संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येईल किंवा परिषदेची सर्व मालमत्ता सरकार जमा करण्यात येईल आणि त्यानंतर परिषदेचे विसर्जन पूर्ण होईल.

**निधी विनियोग**

१८.

१. परिषदेला मिळणाऱ्या सर्व देणग्या, वर्गण्या, अनुदाने व इतर सर्व उत्पन्न यांचा समावेश परिषदेच्या निधीत होईल. सर्वसाधारण सभेने संमती दिल्यास अन्य कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल. अपरिहार्य परिस्थितीत कार्योत्तर मंजुरीही ग्राह्य धरली जाईल. मात्र, तशी पूर्वसूचना स्थानिक कार्यकारी मंडळाकडून दिली गेली पाहिजे.

२ आजीव सभासदांच्या वर्गणीचा किंवा कोणत्याही अटी वाचून मिळालेल्या द्रव्यरुपी देणग्यांचा शक्य तेवढा भाग व

स्थावर मालमत्तेसाठीच मिळालेल्या देणग्यांचा मिळून एक राखीव निधी करण्यात येईल. त्याचा वापर स्थावर मालमत्ता घेण्यासाठी करण्यात येईल. प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेने संमती दिल्यास अन्य कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल.

३. स्थावर मालमत्ता घेण्यासाठी मिळालेल्या देणग्या, स्थावर मालमत्ता घेण्यासाठी / बांधकाम / स्थावर मालमत्तेच्या मोठ्या दुरूस्त्या / स्थावर मालमत्तेचे नूतनीकरण यासाठीच वापरल्या जातील.

४. परिषदेच्या स्थावर व इतर मालमत्तेची व्यवस्था मुख्य कार्यकारी मंडळाकडे राहील.

## १९. विश्वस्त मंडळ

१. प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ हेच परिषदेचे विश्वस्त मंडळ असेल.

२. गरज पडल्यास व भविष्यात परिषदेचे कार्य वाढल्यास मुख्य कार्यकारी मंडळ तसा प्रस्ताव मांडून त्यावर विचारविनिमयाने परिषदेच्या किमान ३ व कमाल ५ आजीव व्यक्ती सभासदांची मतदानाने निवड करील.

३. विश्वस्तांची निवड / निवडणूक प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेत केली जाईल. यासंबंधीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असायला हवी.

सूचना व अनुमोदनासह उमेदवाराचा लेखी अर्ज सभेपूर्वी चार दिवस कार्यालयाकडे पोचला पाहिजे. या अर्जाची छाननी प्रतिष्ठानचे सचिव व समन्वयक करतील व वैध ठरलेले अर्ज कार्यालयात जाहीर करतील. उमेदवारास सभेच्या एक दिवस आधी दुपारी १२.०० वाजेपर्यंत निवडणूकीतून नाव मागे घेता येईल. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असले तर त्यांची बिनविरोध निवड होईल. निवडून द्यावयाच्या जागांहून जास्त उमेदवार असल्यास निवडणूक होईल. मतदानाचा अधिकार असलेले उपस्थित सभासद गुप्त मतदानपध्दतीने मते देतील. जितक्या जागा असतील तितक्या किंवा कमी उमेदवारांना प्रत्येकी एक याप्रमाणे मत देण्याचा अधिकार मतदाराला राहील. समप्रमाणात मते पडल्यास चिठ्ठ्या टाकून निर्णय घेण्यात येईल.

४. विश्वस्तांची कार्यमुदत पाच वर्षे अथवा अध्यक्षांकडे राजीनामा दिल्यास तो मंजूर होईपर्यंत राहील. तसेच उपस्थितांची किमान २/३ मते मिळाल्यास साधारण सभेस कोणत्याही विश्वस्तास काढता येईल. मात्र,त्यासंबंधीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असायला हवी. निवृत्त होणारे विश्वस्त निवडणुकीस / निवडीस पात्र असतील.

५. वरील क्रमांक २,३ नुसार विश्वस्तांची निवड / निवडणूक झाल्यास, परिषदेची स्थावर मालमत्ता व कार्यकारी मंडळाने निर्माण केलेले विविध निधी विश्वस्तांच्या व मुख्य कार्यकारी मंडळाच्या संयुक्त स्वाधीन राहतील. विश्वस्त व कार्यकारी मंडळ यात मतभेद निर्माण झाल्यास त्यावर सर्वसाधारण सभा निर्णय घेईल.

६. विश्वस्त मंडळास निधींची गुंतवणूक करता येईल. बँकेमध्ये खाती उघडता येतील व त्यासंबंधीचे अधिकार योग्य त्या व्यक्तीस देता येतील.

७. कार्यकारी मंडळाच्या सभांसाठी निरीक्षक म्हणून उपस्थित राहण्याचे विश्वस्त मंडळास निमंत्रण देण्यात येईल.

८. विश्वस्त मंडळ आपल्या सभांचे नियम ठरवतील, विश्वस्त मंडळसभेचा अध्यक्ष नेमतील. विषयानुरूप आवश्यक वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या एका किंवा अधिक सभासदांची मदत घेतील.

## २०. संकीर्ण

१. परिषदेचे सर्व व्यवहार प्रामुख्याने मराठीतून होतील.

२. परिषदेच्या वतीने व नियमांनुसार कार्य करणाऱ्या सभासदांना त्या कार्यामुळे कायदेशीर किंवा अन्य आक्षेप आल्यास व्यक्तिशः जबाबदार धरले जाणार नाही. कार्य करण्यासाठी केलेली त्यांची नेमणूक कायदेशीर नव्हती असे नंतर दिसले तरी त्यांनी केलेले कार्य कायदेशीर समजले जाईल.

३. साधारण सभांची व कार्यकारी मंडळाच्या सभांची इतिवृत्ते पुढील सभेत वाचून संमत करण्यात येतील. इतिवृत्त संमत करणाऱ्या सभेच्या अध्यक्षांनी स्वाक्षरी केल्यावर टिपणे संमत व बंधनकारक मानली जातील.

४. कोणत्याही सभेची सूचना चुकून किंवा पराधीन कारणांमुळे काही सभासदांना अजिबात अगर वेळेवर न पोचल्यास त्यामुळे त्या सभेचे कार्य बेकायदेशीर ठरणार नाही.

५. कोणत्याही प्रश्नावरील मतदान हस्तप्रदर्शनाने होईल, परंतु कोणत्याही सभासदाने अगोदर मागणी केल्यास मतदान गुप्त पध्दतीने होईल.
६. परिषदेच्या कामकाजात कागदविरहित पद्धती प्राधान्याने अनुसरण्यात येईल. त्यामुळे अंतर्गत पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या वापरातून करण्यात येईल. त्यासाठी सभासदांनी आपली संपर्कप्रणाली सज्ज ठेवणे अभिप्रेत मानले जाईल. सभेच्या सूचना, इतिवृत्त संक्रमण इ. सारखा नित्यनियमित पत्रव्यवहार प्रामुख्याने माध्यमांच्याच वापराने होईल.
७. मध्यवर्ती कार्यालयाच्या सूचनेनुसार सर्व घटना बदल अथवा इतर बदल स्वीकारण्यात येतील; तसेच उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

* * * * * * * * * * *


**प्रकाशक**

प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी,
कार्यवाह,
सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान,
पानगाव ता. रेणापूर जि. लातूर


**पत्रव्यवहाराचा पत्ता** - १४, प्लॅटिनम अपार्टमेंट्स, देसाई नगर,
नांदेड-सोलापूर रिंग रोड, लातूर – ४१३ ५१२
**भ्रमणध्वनी क्र**. ९१–८३२९०३२१६४ (with What's App), ९४२२६११००२
ई-मेल: skspratishthan@gmail.com
drsantoshkulkarni32@gmail.com

# परिशिष्ट १



Gmail SANTOSH KULKARNI <skspratishthan@gmail.com>

## परिषदेचा विभाग -संस्थे अंतर्गत

2 messages

**herlekardilip** <herlekardilip@gmail.com> Sun, Nov 4, 2018 at 9:46 PM
To: skspratishthan@gmail.com, apd1942@gmail.com, jvjoshi2002@yahoo.co.in, office@mavipamu.mumbai.org

डॉ. संतोष कुलकर्णी
आपला रेणापूर तालुक्यातील संस्थेतर्फे मराठी विज्ञान परिषदेचा विभाग स्थापन करून विज्ञान प्रसाराचे काम करण्याचा मानस समजला. दुसऱ्या संस्थे अंतर्गत विभाग स्थापन करण्याचा या आधीचा परिषदेचा अनुभव चांगला नाही. तुम्ही उदगीर विभागाचे काम सांभाळले आहे ,त्यामुळे तुम्हाला कामाची कल्पना आहे. या बाबीचा विचार करून दोन वर्षाकरिता तात्पुरती परवानगी देत आहोत. या कालावधीत अनुभव लक्षात घेऊन पुढे विभागाची संलग्नता कायम करालयाची की नाही याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.
विभागाचे काम सांभाळणाऱ्या पदाधिकाऱ्याचे नाव व पोस्टाचा पूर्ण पत्ता पिनकोडसहित पाठवा.
तुम्ही परिषदेचा विभाग सुरू करत आहात ,त्यामुळे संलग्नता वर्गणी रू.500/ मराठी विज्ञान परिषद या नावाने पाठवावी.बँक तपशील व्हॉट्स ॲपवर कळवतो.
कळावे
आपला
दिलीप हेर्लेकर
कार्यवाह
मराठी विज्ञान परिषद

**SANTOSH KULKARNI** <skspratishthan@gmail.com> Sun, Nov 4, 2018 at 10:36 PM
To: herlekardilip <herlekardilip@gmail.com>

आदरणीय हेर्लेकर साहेब,
स.न.वि.वि.
आपले पत्र खूप समाधान आणि आनंद देणारे आहे. तितकेच प्रेरणा व जबाबदारी देणारे आहे.
अर्थातच, विभाग सर्व प्रेरणेने कार्यरत राहील, याची ग्वाही देत आहोत.
शुल्कादी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करू.
आपण दिलेली, माझ्या कामाची वैयक्तिक पावती आणि त्या कामाचा, विशेष बाब म्हणून, प्रतिष्ठानअंतर्गत विभागाची अनुमती मिळण्याचा अनुभव, हे सगळे खूप बोधप्रद आहे.

**परिशिष्ट २**

**सुकुप्र / कार्य. / ९३ / २०१९** ०८.०२.'१९

प्रति,

मा. अध्यक्ष,

मराठी विज्ञान परिषद,

मुंबई

सविनय सादर करण्यात येते, की दि. ०७ फेब्रुवारी, २०१९ रोजी बैठकीतील ठरावानुसार सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान पानगाव (ता. रेणापूर जि. लातूर) अंतर्गत मराठी विज्ञान परिषदेचा विभाग सुरु करण्यासाठी प्रस्तावित घटनेतील क्र. ८ या तरतुदीनुसार खालील मुख्य कार्यकारी मंडळास मान्यता देण्यात आली.

| **अ.क्र.** | **नाव** | **पद** |
|---|---|---|
| १. | नानासाहेब निवृत्तीराव गाठाळ | अध्यक्ष |
| २. | संतोष सुधाकरराव कुलकर्णी | सचिव |
| ३. | पुरुषोत्तम भानुदास भांगे | सहसचिव |
| ४. | दत्तात्रय श्रीनिवासराव कुलकर्णी | कोषाध्यक्ष |
| ५. | वृषाली संतोष कुलकर्णी | सदस्य |
| ६. | डॉ. शारंग संतोष कुलकर्णी | सदस्य |
| ७. | वरुण संतोष कुलकर्णी | सदस्य |
| ८. | सुरेंद्र सुधाकरराव कुलकर्णी | सदस्य |
| ९. | डॉ. सौ.संपदा सुधाकर कुलकर्णी (गिरगावकर) | सदस्य |
| १०. | डॉ. गुरुप्रसाद जगदीश देशपांडे | सदस्य |
| ११. | प्रा.मनोहर किशनराव कबाडे | सदस्य |
| १२. | अविनाश अरविंद कुलकर्णी | सदस्य |
| १३. | संजय शंकरराव जड | सदस्य |
| १४. | सुनीत मधुकरराव देशपांडे | सदस्य |
| १५. | अभिजीत नानासाहेब गाठाळ | सदस्य |
| १६. | प्रशांत शिवाजी पाटोदेकर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १७. | डॉ. सौ. अनिता अनिल कुलकर्णी | सदस्य |

तरी कृपया स्वीकृत करून प्रस्तावास रीतसर मान्यता द्यावी, ही नम्र विनंती.
आपल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक व विनम्र धन्यवाद. कृपया सहकार्य करावे, कळावे, स्नेह असावा. धन्यवाद.

आपला विश्वासू,
(स्वाक्षरित)
(प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी)

**परिशिष्ट ३**

**सुकुप्र / कार्य. / ९४ / २०१९** ०८.०२.'१९

प्रति,

मा. अध्यक्ष,

मराठी विज्ञान परिषद,

मुंबई

सविनय सादर करण्यात येते, की दि. ०७ फेब्रुवारी, २०१९ रोजी बैठकीतील ठरावानुसार सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान पानगाव (ता. रेणापूर जि. लातूर) अंतर्गत मराठी विज्ञान परिषदेचा विभाग सुरु करण्यासाठी प्रस्तावित घटनेतील क्र. ८ या तरतुदीनुसार खालील स्थानिक कार्यकारी मंडळास मान्यता देण्यात आली.

| **अ.क्र.** | **नाव** | **पद** |
|---|---|---|
| १. | प्रा.मनोहर किशनराव कबाडे | समन्वयक |
| २. | श्री. बालासाहेब प्रभाकरराव यादव | कोषाध्यक्ष - तीन वर्षीय सदस्य |
| ३. | श्री. वैजनाथराव चामले | तीन वर्षीय सदस्य |
| ४. | श्री. मुरलीधर बळीराम डोणे | तीन वर्षीय सदस्य |
| ५. | श्री.जगदीशराव मन्मथप्पा बारद | तीन वर्षीय सदस्य |
| ६. | श्री. महारुद्र सिद्धलिंगप्पा हालकुडे | तीन वर्षीय सदस्य |
| ७. | सौ. मुल्ला रुखसाना मैनोद्दीन | एक वर्षीय सदस्य |
| ८. | सौ. प्रणिता सुकेशराव भंडारे | एक वर्षीय सदस्य |
| ९. | दत्तात्रय श्रीनिवासराव कुलकर्णी | स्वीकृत सदस्य |

तरी कृपया स्वीकृत करून प्रस्तावास रीतसर मान्यता द्यावी, ही नम्र विनंती.

आपल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक व विनम्र धन्यवाद. कृपया सहकार्य करावे,

कळावे, स्नेह असावा.

धन्यवाद.

आपला विश्वासू,
(स्वाक्षरित)
(प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी)